वि.दि. दावा क्र.**५७/२०२३**
अनिस वि. हनुमंत व इतर
नि.क्र. ०/५७

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०४ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे शपथेवर विधीज्ञ श्री. पी. एन. काळदाते यांच्यामार्फत–</u>**

६. मला थोडे थोडे लिहीता वाचता येते. ईसार पावत लातूर येथे न्यायालयाच्या बाजुला टंकलिखीत करण्यात आली होती. वादी यांची पंपाजवळ जमीन होती. त्यांनी ती जमीन खरेदी विक्री केली म्हणुन त्यांनी ती जमीन माझ्या मार्फत विक्री केली म्हणुन त्यांची व माझी ओळख झाली. त्यांनी जमीन कोणाला विकली त्या व्यवहाराबाबत मला माहिती नाही. त्या व्यवहारामध्ये मी नाही. ठरावपत्र दिनांक २४/०७/२०१९ रोजी टंकलिखीत करण्यात आले. ठरावपत्राचा स्टॅम्प वादी यांनी पुण्यावरुन आणले होते. सदर ठरावपत्राची दुयम निबंधक कार्यालय येथे नोंद केली की नाही हे मला माहिती नाही. ठरावपत्र झाल्यानंतर पाच लाख रुपये माझ्या समक्ष देण्यात आले. माझ्या समक्ष रक्कम रुपये पाच लाख देण्यात आले त्याबाबत लिखापडी लातूर येथे झाली. लिखापडी कोणी केली त्याचे नाव मला माहीत नाही.

७. आमची बैठक शेतात झाली. बैठकीनंतर पंधरा ते वीस दिवसांनी जमीनीचा ताबा देण्यात आला. ताबा देताना मी स्वत: त्या ठिकाणी हजर होतो. बैठक झाल्यानंतर दोन दिवसांनी ठरावपत्र करण्यात आले. प्रतिवादी क्र.२ यांची जमीन वडीलोपार्जीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ याला आई, वडील, भाऊ व बहीण आहेत. प्रतिवादी

क्र.२ च्या आई, वडील, भाऊ व बहिणींच्या सह्या ठरावपत्रावर घेण्यात आल्या. वादीने लातूरच्या बँकेतुन पैसे उचलुन प्रतिवादी क्र.२ यास दिले. त्या बँकेचे नाव मला माहीत नाही. रक्कम रुपये पाच लाख दिल्यानंतर माझे व वादीचे बोलणे झाले नाही.

८. मी जमीनीच्या व्यवहारामध्ये एजंट म्हणुन काम करतो. या व्यवहारामध्ये मी रक्कम रुपये सात हजार घेतले व दुसऱ्या एजंटने रक्कम रुपये तेरा हजार घेतले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पुढे रक्कम रुपये तीन लाख माझ्यासमक्ष देण्यात आली नाही. सदर जमीन बँकेच्या ताब्यात होती किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमीनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर बोजा आहे याची माहिती मला होती. हे म्हणणे खरे आहे की, जमीनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर बँकेचा बोजा असेल तर त्या जमीनीचा खरेदी विक्रीचा व्यवहार होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.11.17 16:45:30 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–१७/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.